आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२० ऑक्टोबर २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दसरा, विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सर्वत्र उत्साह

- उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या दसरा मेळाव्यासाठी कार्यकर्ते सज्ज

- सत्तापालटासाठीच्या आंदोलनांमधून मूलभूत समस्या सुटत नाहीत, असं सरसंघचालक मोहन भागवत यांचं मत

- अमेरिका आणि संयुक्त अरब अमिरातीच्या परराष्ट्र मंत्र्यांबरोबर डॉ. एस. जयशंकर यांची मुंबईत चर्चा

**आणि**

- आशियाई पॅरा क्रीडास्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंना आज ५ सुवर्णपदकांसह २४ पदकं

**<><><><><>**

आज अश्विन शुद्ध दशमी अर्थात विजया दशमी. नऊ दिवस चाललेल्या नवरात्रौत्सवाची आज दसऱ्याने सांगता होत आहे. नवरात्राचं उत्थापन, रामलीलेचा रावणदहनाने समारोप, शस्त्रपूजन, सीमोल्लंघन, धम्मचक्रप्रवर्तन दिन अशा विविध स्वरुपात हा सण सर्वत्र साजरा होत आहे.

राज्यातल्या साडेतीन शक्तिपीठ मंदिरांमध्ये आज विजयादशमी साजरी होत आहे. शिर्डी इथेही साईबाबा मंदिरात संत साईबाबांच्या १०८व्या समाधी दिन सोहळ्याला प्रारंभ झाला आहे. अनेक ठिकाणी रावणदहनाचे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

साडेतीन मुहूर्तातला एक समजला जाणारा दसरा, सरस्वतीपूजन, दैनंदिन वापरातली उपकरणं आणि हत्यारं यांचं पूजन करुन, आपट्याच्या पानाचं सोनं लुटून, देवदर्शन आणि मिष्टान्न भोजन करुन साजरा करत आहेत. घरोघरी फुलांची तोरणं, आणि रांगोळ्यांची सजावट केली आहे. ठिकठिकाणी  सांस्कृतिक कार्यक्रमही होत आहेत. सोने, चांदी आणि मौल्यवान वस्तूंच्या तसंच घरखरेदीचे व्यवहारही आज होत आहेत.

दसऱ्यानिमित्त आज देशभरातले शेअर बाजार बंद आहेत.

विजया दशमीनिमित्त राजकीय पक्षांचे मेळावेही होत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा आज मुंबईत शिवाजी पार्क इथं होणार आहे. गोरेगाव इथं नेस्को मैदानावर शिवसेनेचा मेळावा होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या मेळाव्याला संबोधित करतील.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी देशवासियांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

आज ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दसऱ्याच्या दिवशी नागपूरच्या दीक्षाभूमीवर आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला होता. तेव्हापासून दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. नागपूरच्या दीक्षाभूमीवर आज संध्याकाळी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा साजरा केला जाणार आहे. या निमित्तानं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मुंबईत दादर इथं तसंच राज्यभरात विविध ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं.

**<><><><><>**

सत्तापालटासाठीच्या आंदोलनांमधून मूलभूत समस्या सुटत नाहीत, असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडलं आहे. नागपूर इथं आरएसएसच्या वार्षिक विजयादशमी उत्सवात ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- मोहन भागवत***

अशा शक्तींवर आळा घालण्याची क्षमता भारतात असल्याचा विश्वास मोहन भागवत यांनी व्यक्त केला. समस्या कायम राहतील, लोकशाहीत आंदोलनं होणारच, पण त्यांचा उद्देश समस्यांचं निराकरण करणं हा असायला हवा, आपल्या कृत्यांमुळे समाजाचं विभाजन होणार नाही, याची काळजी घ्यायचं आवाहन त्यांनी राजकीय नेते, आंदोलक आणि प्रशासनाला केलं.

भावना कितीही तीव्र असल्या, तरी राज्यघटनेनं घालून दिलेल्या मर्यादा, नागरी समाजाच्या संकेत आणि सुसंस्कृत वर्तणुकीचा आदर करायलाच हवा, असंही त्यांनी सुचवलं.

OTT व्यासपीठ आणि त्यावरच्या कंटेटवर निर्बंध आणण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी सरकारला दिला. फेक व्हिडिओ, अंमली पदार्थ, पर्यावरणाची हानी यासारख्या मुद्द्यांवरही त्यांनी चिंता व्यक्त केली.

या कार्यक्रमाला माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, इस्राइलचे मुंबईतले वाणिज्यदूत यानिव रेवाच उपस्थित होते.

<><><><><>

राज्यातल्या दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी शिवसेनेच्या वतीनं दिवाळीचा शिधा थेट शेतकऱ्यांच्या घरात हा उपक्रम हाती घेतला आहे. याअंतर्गत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातल्या निवासस्थानातून आज दुष्काळग्रस्तांसाठी मदत साहित्य घेऊन जाणारे ट्रक शिंदे यांनी हिरवा झेडा दाखवून रवाना केले. शिवसेनेचे कार्यकर्ते हे साहित्य थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणार आहेत.

<><><><><>

जालना जिल्ह्यातलं आंतरवाली सराटी हे गाव दत्तक घेत असल्याची घोषणा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज केली. बीड जिल्ह्यात पाटोदा तालुक्यामध्ये भगवानगड इथे आयोजित दसरा मेळाव्यात त्या बोलत होत्या. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षण आंदोलनाचा केंद्रबिंदू असलेल्या या गावाचा विकास करण्यात येईल, असंही त्या म्हणाल्या. दुष्काळाचा फटका सर्वांना सारखाच बसतो, त्यामुळे या संकटाशी लढण्यासाठी जातीभेद विसरून एकत्र यायला हवं असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या राजकीय नेत्यांचा पराभव करावा असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी केलं आहे. बीडमध्ये नारायणगड इथं आयोजित दसरा मेळाव्याला ते संबोधित करत होते. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलेल्या तुटपुंज्यामदतीवरुन त्यांनी सरकारवर टीका केली. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आर्थिक व्यवहारांवर आरोप केले.

<><><><><>

विजयादशमीनिमित्त गडचिरोली इथल्या चांदाळा रोडवरच्या आदिवासी गोटूल भूमीवर आदिवासी देवी-देवतांची महापूजा आणि प्रबोधन मेळावा आयोजित करण्यात आला. गेल्या ३५ वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे.

<><><><>

गेल्या अनेक वर्षांपासून विजयादशमीच्या मुहूर्तावर नवीन लाल कांदा खरेदी-विक्रीची परंपरा असलेल्या नाशिकमधल्या उमराणे इथल्या देवरे कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा लिलावाचा शुभारंभ करण्यात आला. या कांद्याला प्रतिक्विंटल ७ हजार १७१ रुपये बाजार भाव मिळाला तर जवळच असलेल्या खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीतल्या कांद्याला प्रतिक्विंटल ९ हजार ११ रूपये दर मिळाला.

<><><><>

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ आणि परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांच्यात आज ऊर्जा, तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातल्या सहकार्यासह विविध विषयांवर मुंबईत तपशीलवार चर्चा झाली.

भारत ही तेल शुद्धीकरण क्षेत्रातली आघाडीची महाशक्ती आहे. व्हेनेझुएलात तेल उत्पादन कारखाना सुरू करण्याबाबत अमेरिकेचं प्रतिनिधीमंडळ रिलायन्सशी चर्चा करेल, अशी माहिती रुबिओ यांनी दिली. यासंदर्भात ते उद्या जामनगरला भेट देणार आहेत.

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या थोड्याच बाबींना अंतिम स्वरूप देणं बाकी असून लवकरच ते काम पूर्ण होईल. या कराराबाबत आपण खूप आशादायी आहोत, असं रुबिओ यांनी सांगितलं. रुबिओ, जयशंकर आणि संयुक्त अरब अमिरातीचे उपप्रधानमंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान यांच्यांतही आज विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी गेटवे ऑफ इंडिया जवळ रुबियो यांची भेट घेतली.

<><><><>

जागतिक पातळीवर अस्थिर वातावरण असतानाही भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातला द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे गेला आहे. दोन्ही देशातल्या व्यापार करारानंतर ही प्रगती झाली आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी

आज मुंबईत दिली. संयुक्त अरब अमिरातीचे उपप्रधानमंत्री आणि परराष्ट्र मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नह्यान यांच्याशी द्विपक्षीय चर्चेच्या वेळी ते बोलत होते.

आखाती देशांमधल्या परिस्थितीविषयी जयशंकर यांनी यावेळी चिंता व्यक्त केली. चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता निर्माण करण्याच्या सर्व प्रयत्नांना भारताचा पाठिंबा असेल. खतं, कच्चं तेल आणि इतर सामानांची सुरक्षित वाहतूक सुरू राहिली पाहिजे, याचा पुनरुच्चार जयशंकर यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई पॅरा क्रीडास्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी आज ५ सुवर्णपदकांसह २४ पदकांची कमाई केली. सध्या ९ सुवर्ण, ११ रौप्य आणि १५ कांस्य पदकांसह भारत पदक तालिकेत सहाव्य स्थानी आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

(आशियाई पॅरा स्पर्धेतला आजचा दुसरा दिवस भारतीयांच्या आनंदात आणखी भर घालणारा ठरला. **निषाद कुमार** यानं पुरुषांच्या लांब उडी आणि उंच उडी स्पर्धांमध्ये २ सुवर्णपदकांना गवसणी घातली. थाळीफेक स्पर्धेत देवेंद्र कुमार आणि ***प्रणव सूरमा*** *यांनी सुवर्णपदक, तर* ***राम रतन सिंह*** *यानं रौप्यपदक पटकावलं.*

***दीप्ती जीवनजी*** *हिनं महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली, तसंच ५६ पूर्णांक ३६ शतां◌ंश सेकंद वेळ नोंदवून स्पर्धेत नवा विक्रमही प्रस्थापित केला. वेगळ्या गटात २०० मीटर स्पर्धेत* ***सिमरन****नं सुवर्णपदक पटकावलं, तर याच स्पर्धेत* ***तेजलबेन दामोर****नं कांस्यपदक मिळवलं.*

*पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात* ***मनीष नरवाल*** *यानं रौप्यपदकावर नाव कोरलं आणि २०२८च्या लॉस अँजेलिस पॅरालिम्पिकमधलं स्थानही निश्चित केलं. महिला गटात* ***सृष्टी अरोरा****नं कांस्यपदक पटकावलं.*

*पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत* ***प्रदीप कुमार****नं रौप्यपदक, तर* ***आयुष वर्मा****नं कांस्यपदक मिळवलं.*

*पॉवरलिफ्टर* ***अशोक*** *यानं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावलं.*

*गोळाफेकपटू* ***प्रवीण कुमार*** *यानं वैयक्तिक विक्रम नोंदवत कांस्यपदकाला गवसणी घातली.*

*जलतरण स्पर्धेत पुरुषांच्या विविध स्पर्धांमध्ये* ***हिमांशू नंदाल*** *आणि* ***निरंजन मुकुंदन*** *यांनी कांस्यपदक पटकावलं.*

*टेबल टेनिसपटूंनीही आज ५ कांस्यपदकांची लयलूट केली. स्टँडिंग प्रकारात पदक मिळवणारे* ***रवी बेबी सहाना*** *आणि* ***प्राची पांडे*** *हे पहिले भारतीय पॅरा टेबलटेनिसपटू ठरले आहेत. दोघांनी या स्पर्धेत कांस्यपदक पटकावलं.* ***भाविना पटेल*** *आणि* ***सोनलबेन पटेल*** *यांनीही कांस्यपदकाची कमाई केली. पुरुषांच्या स्पर्धेत* ***जेहान मदन*** *यानंही कांस्यपदकावर नाव कोरलं.*

*राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांनी पदकविजेत्या खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.*

**<><><><><>**

राज्यातल्या साहाय्यक प्राध्यापक पदासाठीच्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षा म्हणजेच सेट या परीक्षेचं प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध झालं आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावरून ते डाऊनलोड करून घ्यावं असं आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागानं केलं आहे. ही परीक्षा येत्या रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

लखनौमध्ये एका कॅफे मालकाच्या हत्येप्रकरणी श्रद्धा दुबे या फॅशन मॉडेलला आज नागपुरातून अटक करण्यात आली. गेल्या ११ दिवसांपासून ती फरार होती. लखनौच्या हजरतगंज भागातल्या एका कॅफे मालकाची ९ ऑक्टोबर रोजी हत्या झाली होती. या प्रकरणी श्रद्धा दुबे, तिची बहीण आणि एका अन्य आरोपीवर संशय व्यक्त करण्यात आला होता.

**<><><><><>**

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार केल्या प्रकरणी कोटा इथे अटक केलेल्या तिघांना घेऊन आज मुंबई पोलीस मुंबईच्या दिशेने रवाना झाले. या तिघांना काल कोटा रेल्वे स्थानकावर पकडण्यात आलं होतं.

**<><><><><>**

महिला क्रिकेट मध्ये भारत आणि झिंबाब्वे यांच्यातल्या टी-ट्वेंटी मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना रायपूरमध्ये सुरू आहे. या सामन्यात भारतीय महिलांनी नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २ षटकात बिनबाद १४ धावा झाल्या होत्या. यापूर्वीचे दोन्ही सामने जिंकून भारतानं ही मालिका जिंकली आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर आणि सातारा परिसरात आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**//<><><><><>//**